साप्ताहिक

POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी  एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343

R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक २४ ● मंगळवार, दि. ४ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना केवायसीसाठी १८ नोव्हेंबर पर्यत मुदत

मुंबई दि. ३ : मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी व लाभार्थ्यांना नियमितपणे आर्थिक लाभ मिळावा याकरीता https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ई-केवायसी ची सुविधा १८ सप्टेंबर पासून दोन महिन्याच्या कालावधी करीता उपलब्ध करण्यात आली आहे.

ई-केवायसी ची प्रक्रिया अत्यंत सोपी व सुलभ असून आत्तापर्यंत अनेक लाभार्थ्यांनी ई-केवायसी ची प्रकिया यशस्वी पूर्ण केली आहे . इतर लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना ई-केवायसी प्रक्रियेबाबत येणाऱ्या समस्यांवर उपाययोजनाबाबत आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

## पोलीस दीपक शिंदे यांचे विद्यार्थ्यांना पोलीस भरती व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

रिसोड (प्रतिनिधी) - तालुक्यातील व्याड येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ३ नोव्हेंबरला याच विद्यालयाचे माजी विद्यार्थी महाराष्ट्र पोलीस दीपक शिंदे यांनी दहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांला पोलीस भरती सह विविध स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केले.

विद्यालयात झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक रवी अंभोरे ,मार्गदर्शक महाराष्ट्र पोलीस दीपक शिंदे , व गजानन घाटोळ,प्रवीण सरनाईक ,गणेश हेंबाडे रमेश प्रधान नरेश बचाटे,प्रा.गजानन लांभाडे, दुर्गा घोगरे इत्यादी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.सर्वप्रथम दीपक शिंदे यांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. दीपक शिंदे यांनी मार्गदर्शन करताना स्वामी विवेकानंद विद्यालयात शिकत असताना शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन केवळ शिकवीन्यापुरते नाही तर जीवन घडविण्यासाठी प्रेरक आहे.त्यांच्या यशाचे श्रेय



शिक्षकांना दिले.अतिशय नाजूक परिस्थिती असताना सतत परिस्थितीची जाणीव ठेवून आई-वडिलांच्या श्रमाचे चीज व्हावे आणि आपल्या आयुष्याचा उद्धार व्हावा यासाठी शिक्षण हेच सर्वात महत्त्वाचे आणि योग्य साधन आहे याची जाणीव ठेवून शिक्षकांनी दिलेले मार्गदर्शन प्रामाणिकपणे लक्षात ठेवून त्या दिशेने मार्गक्रमण केल्यामुळे आज पोलीस भरती होणे शक्य झाले.प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षकांचा आदर करावा शिक्षक समोर असो किंवा नसोत त्यांचा आदर करणारा विद्यार्थी जीवनात नक्की यशस्वी होतो आणि सध्या स्पर्धेचे युग आहे म्हणून स्पर्धा परीक्षा विषयी जाणून घेणे सतर्क राहणे ही विद्यार्थ्यांची काळाची गरज आहे.विद्यार्थ्यांने आपल्या आई वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी एक चांगला आदर्श नागरिक होण्यासाठी सतत प्रयत्न करू आपल्या शाळेचे,गावाचे व देशाचे नाव उज्वल करावे असे मार्गदर्शन शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक गजानन लांबाडे यांनी तर आभार गजानन घाटोळे यांनी मानले.

## ग्राहक पंचायत सभा व दिपावली स्नेह मिलन कार्यक्रम



रिसोडः ग्राहक पंचायत शाखा रिसोड ची सर्वसाधारण सभा व दीपावली स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन येथील श्री शिवाजी विद्यालयाच्या हॉलमध्ये ३१ ऑक्टोबर रोजी करण्यात आले होते.

या सभेच्या अध्यक्षस्थानी रिसोड तालुका ग्राहक पंचायत चे अध्यक्ष प्रभाकर पाटील हे होते, तर प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा कोषाध्यक्ष जयंत वसमतकर, जिल्हा कार्यकारणी सदस्य मोहनराव देशमुख हे होते. दीपावली स्नेह मिलन व नवीन सदस्याचा परिचय करून सभेला सुरुवात करण्यात आली ग्राहक पंचायत ही एक स्वयंसेवी गैर-नफा संस्था आहे जी ग्राहकांच्या हक्काचे संरक्षण आणि त्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी कार्यरते भारतात ग्राहक संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत ही संस्था कार्यरत आहे त्या अनुषंगाने ग्राहकांना त्यांचे हक्क व कर्तव्ये समजावून देणे, बनावट जाहिराती, भेसळ ,जास्त किंमत आकारणी विरुद्ध जनजागृती करणे, ग्राहकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी जिल्हा राज्य राष्ट्रीय आयोग यांच्याकडे कायदेशीर सल्ला मागणे ,मोफतअल्पखर्चात कायदेशीर सल्ला आणि न्यायालयीन प्रक्रिया, उत्पादने सेवांची गुणवत्ता तपासणे ,तसेच ग्राहककल्याण निधी तक्रार निवारण पोर्टल या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली तसेच तालुका ग्राहक पंचायत ला कार्यालया करिता नगरपरिषदेकडे जागेची मागणी करणे बाबत ठराव घेण्यात आला.

सदर सभेला प्रभाकर पाटील, जयंत वसमतकर, मोहनराव देशमुख , अरुणभाऊ लोथे, भारतकोकाटे, प्रा. संजीव गायकवाड ,प्रा. सुरेशराव जुनघरे ,प्रा. प्रतापराव नायक, डॉ. रामानंद गट्टानी, प्रभाकर जिरवणकर, बबनराव सुरुशे , प्राचार्य सज्जन बाजड , प्राचार्य संजयराव देशमुख, यांच्यासह ग्राहक पंचायत चे सदस्य उपस्थित होते जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य संतोष वाघमारे यांच्या आईचे नुकतेच निधन झाल्यामुळे त्यांना श्रद्धांजली अर्पण करून सभेची सांगता करण्यात आली. (वि. प्र)

## स्व. पाटील महाविद्यालयात इंदिरा गांधी पुण्यतिथी व सरदार पटेल यांची जयंती साजरी



रिसोडः स्थानिक स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एम .एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती तसेच राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी या प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रियदर्शनी इंदिरा गांधी ह्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या प्रमुख नेत्या व भारताच्या पहिल्या आणि आजपर्यंतच्या एकमेव महिला पंतप्रधान आहेत.

तसेच आजच्या दिवशी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता म्हणून साजरी केली जाते. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एकतेसाठी मोठे योगदान दिल्याचे मत व्यक्त केले. यानंतर राष्ट्रीय एकता दिनानिमित्त एकतेची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. प्रकाश हनवते यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. तुळशीराम भोईर यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होत(वि. प्र).

## एपीआय डोंगरे यांचेवर गुन्हा दाखल करा

### शेख इरफान कुरेशी यांची जिल्हा पोलीस अधिक्षक यांना तक्रार

**रिसोड :** रिसोड पो.स्टे. मधे कार्यरत ए पि आय शिव चरण डोंगरे यांचेवर गुन्हा दाखल करा अशि तक्रार माजी नगर सेवक इरफान कुरैशी यांनी रिसोड पोलिस स्टेशन ला दि.३ नोव्हेंबर रोजी दिलेल्या तक्रारीत केले आहे.तक्रारीत नमुद करण्यात आले आहे कि दिनांक २ नोव्हेंबर रविवारी सकाळी ११.०० वाजता नवीन प्रभाग १ मध्ये अमरदास नगर येथे निवडनुकीचे दृष्टीकोनातून लोकांना भेटी गाठी करत अस्ताना रिसोड पोलीस आणि वाशीम उपविभागीय पोलीस अधिकारी वा पथक तिथे कार्यवाही साठी आला असताना तेथे भरपूर लोकांचा जमाव जमला होता. मला त्या कार्यवाही बद्दल काहीही माहित नसताना मी सविस्तर माहिती काढण्य साठी लोकांसोबत चर्चा करत असताना अझख शिव चरण डोंगरे यांनी माझ्यावर त्यांनी काठी उचली व शिवीगाळ केली. याला उचला याला आत घ्या ज्या तपासात आले त्या तपासात त्याच्यावर गुन्हा दाखल करा अशी दम दाटी करत होते तेथील लोकानी सांगितले कि हे नगर सेवक आहे अझख डोंगरे सांतग होते असे ५६ नगर सेवक पाहिले आणि अंगावर धाऊन आले व पुन्हा शिविगाळ केली. पोलीस प्रशासन जेव्हा कार्यवाही करण्या करीता तेथे पाठविण्यात आले होते तर त्याना एक माजी नगर सेवका वर आणि आम जनतेवर दम दाटी व शिवीगाळ करण्या करीता पाठविण्यात आले होते का? अझख शिव चरण डोगरे यांच्या वर पोलीस प्रशासनाने कडक कार्यवायी करण्यात यावी जेणे करून सामान्य जनतेचा पोलीस प्रशासनावर विश्वास कायम राहणार.असे तक्रारीत म्हटले आहे.



नगरसेवक असताना सुद्धा पोलिसांकडून असल्या प्रकारची वागणूक ही निंदनीय आहे तर सामान्य माणसासोबत पोलिसांची वागणूक कशी असेल. एपीआय डोंगरे यांची कार्यशैली व त्यांची बोलण्याची पद्धत अत्यंत चुकीची असून ही सामान्य नागरिकांसाठी चांगली नाही. यावर पोलीस वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्वरित लक्ष घालून योग्य ती कारवाई करावी

**इरफान कुरेशी**
**माजी नगरसेवक रिसोड**

# नव्या युगाची नांदी

भारताच्या महिला संघाने रविवारी इतिहास घडवला. महिलांच्या एकदिवसीय विश्वकरंडक विजेतेपदाला गवसणी घालताना हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाने गेल्या अनेक वर्षांची प्रतिक्षा संपुष्टात आणली. नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडिअमवर हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने बलाढ्य दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव करत विश्वविजेतेपद मिळवले. हा कोणा एकट्या खेळाडूचा विजय नाही, तर सांघिक विजय आहे. हरमनप्रीतचे नेतृत्व अधोरेखित करत असतानाच स्मृती मानधना, शेफाली वर्मा, दीप्ती शर्मा, जेमीमा रॉड्रीक्स, अमनज्योत कौर या व अशा कितीतरी खेळाडूंनी या विजयात मोलाचा वाटा उचलला. या स्पर्धेला सुरुवात झाल्यापासून गेली २५ वर्षे आपण या क्षणाची प्रतीक्षा करत होतो. त्यातही तब्बल दोन वेळा अंतिम फेरी गाठूनही आपण विजेतेपदापासून वंचित राहिलो होतो. त्या सगळ्याची कसर यंदा भरून निघाली.

भारतीय क्रीडा क्षेत्राच्या इतिहासात भारताच्या महिला क्रिकेट संघाने एक सोनेरी पान लिहिले. काय नव्हते या विजेतेपदात, जिद्द, कठोर मेहनत, पराभव विसरून केलेला जिगरबाज खेळ सगळे काही दिसत होते. उपांत्य लढतीत बलाढ्य ऑस्ट्रेलियाला चारीमुंड्या चीत करत आपण थाटात अंतिम फेरी गाठली. याच ऑस्ट्रेलियाने आपल्याला वारंवार त्रास दिला होता. त्यांनी आपल्या तोंडून अनेकदा या स्पर्धेच्या विजेतेपदाचा घास हिसकावून घेतला होता. त्यातही यंदाच्या स्पर्धेत आपण साखळीतील सलग तीन सामने गमावले होते. त्यावेळी अनेकांनी विजेतेपदाची आशाही सोडली होती.

मात्र, आपला संघ फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून भरारी घेताना दिसला . उपांत्य लढत खेळताना आपण त्रिशतकी धावांचा यशस्वी पाठलाग केला. तिथेच संपूर्ण संघ पेटून उठला व अंतिम लढतीत दक्षिण आफ्रिकेलाही नमवत आपण विश्वविजेते बनलो. अंतिम लढतीत आपण एकवेळ सव्वातीनशे धावाही पार करू असे चित्र होते. परंतु तळातील फलंदाज अपयशी ठरल्याने आपल्याला २९८ धावांवर समाधान मानावे लागले. दक्षिण आफ्रिकेला नमवणे सोपे नव्हते. त्यांची कर्णधार लॉरा वोल्वार्डटने शतकी खेळी करत आपल्यावरचे दडपण वाढवले होते. मात्र, दीप्ती शर्माने मोक्याच्या क्षणी एकाच षटकात दोन गडी बाद केले त्यात एक वोल्वार्डट होती. तिचा झेल घेतला गेला व संपूर्ण भारतीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला. १९७३ मध्ये महिलांच्या एकदिवसीय विश्वकरंडकाची सुरुवात झाली. तेव्हापासून आपण सातत्याने विश्वविजेतेपदाची आशा करत होतो, तो क्षण यंदा अनुभवायला मिळाला.

बलाढ्य ऑस्ट्रेलियाने तब्बल सात वेळा ही स्पर्धा जिंकल्यामुळे यंदाही तेच हॉट फेव्हरीट होते. तसेच इंग्लंडने चार वेळा ही स्पर्धा जिंकली होती. त्यामुळे त्यांच्याकडेही संभाव्य विजेते म्हणून पाहिले जात होते. स्पर्धा भारतातच होत असल्याने भारतीय संघावरही आशा होती.

मात्र, साखळीतील तीन सामने गमावल्यावर ही आशा धूसर बनत चालली होती. मात्र, नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच होते. हरमनप्रीत कौरच्या संघाने कसोशीने खेळ केला. मिळालेल्या सुट्टीच्या दिवसांत नेटमध्ये घाम गाळला. आपल्या चुका दुरुस्त केल्या व उपांत्य लढतीत ऑस्ट्रेलियाला धूळ चारत अंतिम फेरी गाठली. या विजयात संघातील खेळाडूंबरोबरच मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांचाही वाटा मोलाचा ठरला. सचिन तेंडुलकर व विनोद कांबळीसह अमोलही भारतीय संघात स्थान मिळवण्याचा दावेदार होता.

मात्र, संपूर्ण कारकिर्दीत त्याला एकदाही भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली नाही. मात्र, आता महिला संघाचा प्रशिक्षक बनल्यावर त्याने सर्वात मोठे विजेतेपद देशाला मिळवून दिले. दीप्ती शर्माने टाकलेल्या चेंडूवर हरमनप्रीतने अफलातून झेल घेत दक्षिण आफ्रिकेचा डाव संपुष्टात आणला व भारताच्या विश्वविजेतेपदावर मोहोर उमटवली.

दीप्तीने मोक्याच्या क्षणी सर्वोत्तम गोलंदाजी करत पाच गडी बाद केले. यात एक गोष्ट महत्त्वाची होती. या स्पर्धेपूर्वी संघात निवड न झालेली शेफाली वर्मा घरात टीव्हीवर सामने पाहात होती. संघातील एक खेळाडू जायबंदी झाल्याने शेफालीचा संघात समावेश झाला व तीच अंतिम सामन्याची स्टार ठरली. देवाचीच ही इच्छा असावी. तिने ७८ चेंडूत ८७ धावा करत भारताच्या धावसंख्येत मोठा वाटा उचलला.

# लाखो रुपयांच्या बनावट नोटांचा साठा जप्त

## रिसोडमध्ये खळबळ : दोन आरोपींना अटक

**रिसोड,ता.२ :** शांत आणि सुसंस्कृत शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रिसोडमध्ये एका घटनेने मोठी खळबळ उडाली आहे. २ नोव्हेंबर रोजी, रिसोड शहरातील अमरदासनगर परिसरात पोलिसांनी एका अतिशय धाडसी कारवाईत अमली पदार्थ, गांजा आणि लाखो रुपयांच्या बनावट नोटांचासाठा जप्त केला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाच्या विशेष पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे ही धडाकेबाज कारवाई केली आहे. अंदाजे १८ ते २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन मुख्य आरोपींना जागीच अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,रिसोड शहरातील अमरदासनगर भागात एका राखाडी रंगाच्या बलेनो कारबद्दल पोलिसांना संशय होता. या माहितीच्या आधारे, उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, रिसोड आणि मालेगाव पोलिस ठाण्याच्या संयुक्त पथकाने क्षणार्धात घटनास्थळी धाड टाकली. कारची कसून तपासणी केली असता, पोलिसांना अतिशय धक्कादायक वस्तू आढळल्या. यात एमडीएम सारखा दिसणारा अमली पदार्थ , गांजा आणि मोठ्या प्रमाणात बनावट नोटांचा गठ्ठा आढळला.त्यामध्ये ६० ग्रॅम वजनाचा एमडीएम सारखा पांढरा पदार्थ, सुमारे २ किलो गांजा व ३७८ पाचशे रुपयांच्या बनावट नोटा एकूण (किंमत सुमारे १ लाख ८९ हजार रुपये.) गुन्ह्यात वापरलेली ग्रे रंगाची बलेनो कार, दोन मोबाईल फोन आणि अन्य साहित्य जप्त केले. हा संपूर्ण मुद्देमालाची किंमत अंदाजे १८ ते २० लाख रुपये इतकी आहे. घटनेची माहिती मिळताच, उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल यांनी स्वतः घटनास्थळी धाव घेतली आणि संपूर्ण परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन पाहणी केली. त्यांनी संबंधित पोलिसांना या प्रकरणाचा संपूर्ण छडा लावण्यासाठी पुढील तपासाच्या सूच[illegible]आहेत. या अत्यंत गंभीर प्रकरणाचा तपास रिसो[illegible]नचे पोलिस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या मा[illegible] युद्ध पातळीवर सुरू आहे.



रिसोड : जप्त करण्यात आलेली कार व पोलिस

### राज्याबाहेरचे 'कनेक्शन' असल्याची शक्यता

■ कारवाईत सहभागी झालेल्या पोलिसांनी आरोपींना घटनास्थळीच मुसक्या आवळल्या. सूत्रांच्या माहितीनुसार, या संवेदनशील प्रकरणाचे धागेदोरे केवळ रिसोडपर्यंत मर्यादित नसून, राज्याबाहेरील काही मोठ्या व्यक्तींशी जोडले गेले असण्याची प्रबळ शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. हे अमली पद[illegible] नोटांचे विशाल जाळे बाहेर राज्यातून [illegible] असल्याचा पोलिसांना संशय आहे.

# हिवाळी अधिवेशन लांबण्याची शक्यता?

**नवी मुंबई /नागपूरः** महाराष्ट्र विधानसभेचे हिवाळी अधिवेशन दरवर्षी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात नागपूर येथे भरते. मात्र, यंदा राज्यात स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांमुळे अधिवेशन लांबणीवर जाण्याची शक्यता आहे. प्रशासकीय यंत्रणा निवडणुकांमध्ये गुंतलेली असल्याने या अधिवेशनाचे वेळापत्रक किमान १० दिवसांनी पुढे ढकलले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रशासकीय कामकाजाची व्यस्तता माहितीनुसार, सुरुवातीला हे अधिवेशन ८ डिसेंबरपासून सुरू करण्याचा प्रस्ताव होता. परंतु, निवडणुकांची मतमोजणी, निकालानंतरच्या प्रशासकीय कामकाजाची व्यस्तता आणि नव्या प्रतिनिधीच्या शपथविधीच्या तारखा लक्षात घेता, आता अधिवेशन १८ ते २० डिसेंबरदरम्यान सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ठेकेदारांच्या काम बंद आंदोलनामुळे अगोदरच हिवाळी अधिवेशनावर संकटाचे ढग दाटले आहेत. मंत्र्यांच्या अनेक बंगल्यांचे काम प्रलंबित आहे. १५० कोटींची बिले थकीत असल्याने ठेकेदारांनी काम बंद आंदोलन सुरू केले आहे.

त्यामुळे नागपूरऐवजी मुंबईत अधिवेशनाची चर्चा सुरू झाली होती. मात्र नागपूर करारानुसार विधीमंडळाचे एक सत्र नागपुरमध्ये घेणे बंधनकारक आहे. त्यातच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीची आचारसंहिता लवकरच लागण्याची चिन्हे आहेत. डिसेंबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात जिल्हा परिषदेच्या निवडणूकीचे मतदान होईल. त्यात सरकारी यंत्रणादेखील कामात असेल. त्यामुळे त्यानंतरच हिवाळी अधिवेशन घेणे शक्य होणार आहे.

## राज्य शासन व विधानसभा सचिवालयात चर्चा

राज्य शासन आणि विधानसभा सचिवालय यांच्यात याबाबत चर्चा सुरू असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा आणि विधान परिषद अध्यक्ष सहित विधिमंडळ कामकाज समिति सोबत चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येईल,, अशी माहिती आहे. हिवाळी अधिवेशन १८ ते २० डिसेंबर पासून होण्याची शक्यता पावसाळी अधिवेशात विधानसभा अध्यक्षांनी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे ८ डिसेंबर पासून होणार असल्याची घोषणा विधानसभामध्ये केली होती. यामुळे विधिमंडळचा हिवाळी अधिवेशन नागपूर येथे ८ डिसेंबर पासून अपेक्षित होते मात्र हे अधिवेशन १८ ते २० डिसेंबर पासून होण्याची शक्यता आहे.

# वैद्यकीय शिक्षण प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार

रिसोड:स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय रिसोड येथे वैद्यकीय शिक्षणास प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम ठेवण्यात आला होता कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र बबेरवार तर प्रमुख अतिथी डॉ.रामानंद गट्टाणी , प्राचार्य राज कबीर मोहसीन होते. कार्यकमच्या सुरुवातीला मान्यवरांचे हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या सत्कार कार्यक्रमात सत्कार मुर्ती आयुष राजेंद्र बबेरवार एम.बी.बी.एस.नंतर एम.डी. साठी प्रवेश पात्र, कु.श्रृती अमोल जोशी नीट मध्ये६६ %गुण एम.बी.बी.एस. ,कु[illegible]वी सानप एम.बी.बी.एस. या वैद्यकीय शिक्षणास प्रवेश पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे मानवरांच्या हस्ते शाल, श्रीफल ,पुष्पगुच्छ देऊन सत्कार




या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य बी.एन. चव्हाण यांनी केले. कार्यकमाचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र बबेरवार यांनी वैद्यकीय सेवा ही काळाची गरज असुन मिळकती पेक्षा सेवाभाव जास्त असावा असे सांगितले , प्राचार्य राज कबीर मोहसीन, प्रा.जयंतराव हेलोडे, प्रा.नंदन खैरे यांनीही शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी रामभाऊ नरवाडे,वाचनालयाचे संचालक प्राचार्य कमलाकर टेमधरे, केशव इंगळे, साबळे सर ,जगन्[illegible]बरे, विश्वंभर डाखोरे व इतर विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राचार्य शरद टेमधरे यांनी तर आभार गजानन तारापुरे यांनी मानले.

# लोणीच्या श्री सखाराम महाराज विद्यालयाने राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत मिळवला प्रवेश

## विद्यार्थ्यांचे विभागीय स्पर्धेत दमदार प्रदर्शन; रिले, हार्डल्स व धाव स्पर्धेत चमक

**प्रतिनिधी | रिसोड**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित शालेय क्रीडा स्पर्धेत वाशीम जिल्ह्याच्या लोणी बु. येथील श्री सखाराम महाराज विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यशाचे सुवर्ण पंख लावत राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. यवतमाळ येथील जिल्हा क्रीडा संकुलावर ३० ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या विभागीय स्पर्धेत या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून प्रथम क्रमांक पटकावला. या कामगिरीमुळे लोणी बु. परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मैदानी खेळातील ४ बाय ४०० मीटर रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले. या विजयी संघात अभिषेक आंधळे, अभिषेक गिते, अभिषेक काळेगावकर, सचिन आंधळे आणि सूरज पवार या विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्याचबरोबर ४०० मीटर हार्डल्स स्पर्धेत अभिषेक गीतेने तृतीय क्रमांक, तर ५००० मीटर धाव स्पर्धेत वेदांत लांडगेने तृतीय क्रमांक मिळवून विद्यालयाला आणखी सन्मान मिळवून दिला. या यशाबद्दल प्राचार्य कल्याण महाराज जोशी, सचिव सखाराम महाराज जोशी आणि अध्यक्ष गोविंद महाराज जोशी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच मार्गदर्शक शिक्षक गोविंद शर्मा यांच्या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केल्याचे त्यांनी सांगितले.

या कामगिरीमुळे लोणी बु. परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून, राज्यस्तरीय स्पर्धेतही हे विद्यार्थी उत्कृष्ट कामगिरी करतील, असा विश्वास शिक्षक व ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. श्री सखाराम महाराज विद्यालयाने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तापूर्ण क्रीडा परंपरेचा ठसा उमटवला आहे.

**पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720**


हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# परिवहन, शिक्षण व आरोग्य पायाभूत विकासाची त्रिसूत्री

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

नागपूर : सुमारे २० वर्षांपेक्षा अधिक काळापासून नागपूर महानगराच्या भविष्यातील गरजा ओळखून वेळोवेळी जे नियोजन केले, त्याचा सातत्यपूर्ण पाठपुरावा करून विकासकामे करून घेतली. त्यामुळे आजघडीला नागपूर महानगर हे जागतिक नकाशावर विकासासाठी ओळखले गेले आहे. यापुढेही नागपूरच्या वाढत्या विस्ताराबरोबर येथील रोजगार निर्मिती, पायाभूत सुविधा, सक्षम परिवहन यंत्रणा, जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी गुणवत्तापूर्ण शैक्षणिक व आरोग्याच्या सुविधा यावर प्राधान्याने भर देऊन विकासाचा एक आदर्श मापदंड निर्माण करू, असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

जिल्हा नियोजन भवन येथे रविवारी आयोजित पत्रकार



परिषदेत ते बोलत होते. यावेळी महापालिका आयुक्त अभिजित चौधरी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सभापती संजय मीणा, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी उपस्थित होते. नागपूरच्या विस्तारात सक्षम परिवहन सुविधेची आवश्यकता महत्त्वाची आहे. नागपूर महानगरासह जवळील भागात असलेल्या ग्रामीण भागातून हजारो लोक रोजगार व नोकरीनिमित्त मिहान, हिंगणा एमआयडीसी, कोराडी, वाडी, कळमना मार्केट, बुटीबोरी व अन्य भागात दररोज ये-जा करतात. भविष्यातील प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन प्रत्येक नागरिकाला उत्तम गुणवत्तेच्या सुविधा मिळाव्यात यासाठी नागपूर महानगरपालिका, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मेट्रो आणि एसटी महामंडळामार्फत एक अभ्यासपूर्ण वाहतूक आराखडा तयार करण्यात आला आहे. यातील महत्त्वाच्या बाबी लक्षात घेऊन नागपूरच्या २० किलोमीटर परिघात महानगरपालिकेचा परिवहन विभाग तर नागपूर विकास प्राधिकरणामार्फत त्यांच्या हद्दीत असलेल्या सुमारे ६५० गावांसाठी इलेक्ट्रिक बस सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. नागपूर महानगर अंतर्गत परिवहन सुविधेसाठी मेट्रोची उत्तमरीत्या उपलब्धी आहे.

# तुटलेल्या जिवंत विद्युत वाहीनीने दोन प्राण्याचा घेतला जिव

## मोहजा बंदी वन क्षेत्रातील घटना



रिसोड : तालुक्यातील मोहजाबंदी वनक्षेत्रातील विजवितरण कंपनीच्या मागील अनेक वर्षापासुन जिर्ण झालेल्या जिवंत विद्युत तारा येथिल वनक्षेत्रात तुटुन खाली पडलेल्याने एक गाय व एक कोल्हा विद्युत प्रवाहाचा झटका लागुन ठार झाल्याची घटना .२९ ऑक्टोबर च्या दुपारी ३ वाजता घडली. सरपंच ॲड. गजानन इंगळे यांनी तात्काळ विजवितरण कार्यालयाला घटनेची माहीती देत विद्युत प्रवाह बंद करण्यास माहीती दिली.

मोहजाबंदी वनक्षेत्रातील अनेक वण्यप्राण्याचा मुक्त संचार आसतो. यामध्ये निलगाय, कोल्हा, लांडगा, मोर, लांडोर, ससा, रानडुक्कर, तडस । सतत दिसतात. या वनक्षेत्राच्या मध्ये भागातुन विजवितरण कंपनीचा ३३ केव्हीच्या विद्युत तारा गेलेल्या आहेत. मागील ४० ते ५० वर्षापासुन विद्युततारा आसल्याने हल्ली ह्या जिर्णविज तारा पासुन धोका निर्माण झालेला आहे. कारण या वनक्षेत्रातील गुरा-ढोराच्या चराई साठी अनेक गुराख्यांचा सतत संचारआसतो, तरअनेक मजुर डिंक, जळतणासह विविध वस्तुच्या शोधात या वनक्षेत्रात फिरतात. परंतु आजच्या या घटनेने विज वितरण कंपनीचा भोंगळ कारभारा उघड झाला आसुन, जिवीत हाणी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ता.प्र.

> मोहजाबंदी भागातील बहुतांश विद्युत विहीण्या जिर्ण झालेल्या आहेत. या पासुन ग्रामस्थाच्या जिवाला धोका आहे. सदर जिर्ण विद्युत वाहीण्या बदलण्या संदर्भात विजवितरण कंपनीकडे अनेकदा पत्रव्यवहार केलेला आहे.
>
> ॲड. गजानन इंगळे सरपंच
> ग्रामपंचायत मोहजाबंदी

# रिसोड तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाचा दिलासा

## तब्बल ३२ करोड रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा, तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांची माहिती

रिसोडः रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांना सरकारने अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची तात्काळ आर्थिक मदत दिली आहे. जुलै ते ऑगस्ट २०२५ दरम्यान रिसोड तालुक्यातील ग्रामीण भागात मुसळधार पावसामुळे नद्या व नाले तुडुंब भरून वाहू लागले आणि त्या नदी नाल्यांना पूर येऊन त्याचे पाणी शेतात शिरल्याने हजारो शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पीक नष्ट झाले, त्याचबरोबर माती वाहून गेली आणि काही शेतांमध्ये फक्त दगड शिल्लक राहिल्याने शेतकऱ्यावर मोठ्या प्रमाणात आर्थिक संकट कोसळले होते व शेतकरी त्रस्त झाला होता त्यामुळे



नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी शेतकरी करीत होते. तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी सांगितले की, प्रशासनाने नुकसानीचे मूल्यांकन पूर्ण केले असून, अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांसाठी एकूण ?३७७.३८५ दशलक्ष अनुदान मंजूर केले आहे. यातून ५५,६०७ शेतकऱ्यांपैकी ४३,७६९ शेतकऱ्यांच्या खात्यात ?३२१.७३ दशलक्ष थेट जमा केली गेली आहे. उर्वरित ११,८३८ शेतकऱ्यांसाठी अनुदान मंजूर झाले असले तरी, बँक खात्याशी संबंधित अपूर्ण माहिती, संमती पत्र किंवा अन्य कागदपत्रांची कमतरता असल्याने त्यांच्या खात्यात रक्कम अद्याप जमा झालेली नाही. तहसीलदार तेजनकर यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, आपले बँक खाते क्रमांक, बँक पासबुक माहिती तसेच शेअर्ड खाते असल्यास सह-खातेदारांची स्वाक्षरी असलेले संमतीपत्र ग्रामपंचायत, ग्राम महसूल अधिकारी किंवा कृषी सहाय्यक यांना त्वरित सादर करावे, जेणेकरून अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यात लवकरात लवकर जमा करता येईल.

तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी स्पष्ट केले की, सरकार आणि प्रशासन शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी पूर्णपणे संवेदनशील आणि वचनबद्ध आहे. अतिवृष्टीमुळे बाधित प्रत्येक पात्र शेतकऱ्याला न्याय आणि वेळेवर अनुदान मिळावे यासाठी प्रशासन सतत प्रयत्नशील आहे. रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे पूर्ण करून सरकारी अनुदानाचा लाभ घेणे आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून दिलासा मिळणार आहे. श.प्र

# रिसोड न.प.मध्ये २९ हजार ९६२ मतदार

रिसोड :नगरपालिकेच्या लवकरच होऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये रिसोड नगरपरिषद च्या मतदारांची अंतिम यादी ३१ ऑक्टोबर २०२५ ला प्रसिध्दी झालीअसून २९ हजार ९६२ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार असल्याचे या मतदार यादीतून दिसून येतआहे. याबाबत सविस्तर वृत्तअसे की लवकरच नगरपालिकेची निवडणुक होऊ घातली असून त्या दृष्टीने नगरपालिकेच्या प्रभाग रचनेचे, आरक्षणाचे तसेच मतदार याद्यांची अंतिम तयारी पूर्ण झाली आहे. त्यानुसार रिसोड शहरात एकूण ११ प्रभाग झाले असून त्यामध्ये २३ नगरपरिषद सदस्य तर एक जनतेतून नगराध्यक्ष असे २४ जणांना निवडून द्यायचे आहे . क्रमांक १ ते १० या प्रभागामध्ये प्रत्येकी दोन सदस्य, तर प्रभाग क्रमांक ११ मध्ये ३ सदस्य असे एकूण २३ सदस्य निवडायचे आहेत यासाठीची अंतिम मतदार यादी ३१ ऑक्टोबरला प्रकाशित झाली आहे.

त्यामध्ये प्रभाग क्रमांक १)३३५४ प्रभाग क्रमांक २)२८१३ प्रभाग क्रमांक ३)२०६४ प्रभाग क्रमांक ४)२६७१ प्रभाग क्रमांक ५)१६२३ प्रभाग क्रमांक ६)२६१७ प्रभाग क्रमांक ७)२४३६ प्रभाग क्रमांक ८)२५५५ प्रभाग क्रमांक ९)२९७८ प्रभाग क्रमांक १०)२६०० तर प्रभाग क्रमांक ११ मध्ये ४२५१ असे एकूण २९ हजार ९६२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत .

या प्रभागांमध्ये सर्वात कमी मतदार प्रभाग क्रमांक ५मध्ये १६२३ असून सर्वात जास्त मतदार प्रभाग क्रमांक ११ मध्ये ४२५१आहेत. रिसोड नगरपालिकेचे अध्यक्षपदाचे आरक्षण हे सर्वसाधारणसाठी निघाले आहे. त्यामुळे अध्यक्षपदासाठी अतिशय चुरशीचे वातावरण राहणार आहे तसेच प्रभागा नुसार पडलेल्याआरक्षण नुसार प्रभाग क्रमांक १अ) सर्वसाधारण महिला १ब) सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक २ अ) अनुसूचित जाती २ ब )सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ३अ) नामाप्र ३ब) सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ४अ) अनुसूचित जाती महिला ४ब )सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ५अ )नामाप्र महिला ५ब) सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ६अ) नामाप्र ६ब) सर्वसाधारण महिला प्रभाग क्रमांक ७अ) नामाप्र महिला ७ब) सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ८अ) अनुसूचित जाती महिला ८ब )सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ९अ) नामाप्र ९ब) सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक १०अ) सर्वसाधारण महिला १०ब) सर्वसाधारण, तर प्रभाग क्रमांक ११अ) नामाप्र महीला ११ब) सर्वसाधारण महिला तर ११क) सर्वसाधारण असे आरक्षण निश्चित झाले आहे.

निवडणुकीच्या दृष्टीने शहराची प्रभाग रचना, प्रभागा नुसार आरक्षण तसेच प्रभाग वाईज मतदार याद्याची निश्चिती झाली आहे.

त्यामुळे नगरपालिकेच्या निवडणुकीची तयारी पूर्ण झाली असून आता सर्वांना आचारसंहितेकडे तसेच निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याकडे लक्ष लागले आहे(वि. प्र)

# सरकारी कार्यालयांच्या परिसरात भटक्या कुत्र्यांना खायला देण्यास मज्जाव



## सर्वोच्च न्यायालय करणार आदेश जारी

नवी दिल्लीः सरकारी कार्यालयांच्या इमारतींच्या परिसरात भटक्या कुत्र्यांना खायला घालण्यावर नियमनासाठी निर्देश जारी केला जाईल, असे आज (दि. ३) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. हा आदेश काही दिवसांत वेबसाईटवर अपलोड केला जाईल, असेही खंडपीठाने नमूद केले आहे.

काही सरकारी इमारतीच्या परिसरात कर्मचारी भटक्या कुत्रांना खाण्यात देतात. त्याबाबत आम्ही काही दिवसांत आदेश जारी करू, असे निरीक्षण न्यायमूर्ती विक्रम नाथ यांनी नोंदवले. यासंदर्भात कोणताही आदेश देण्यापूर्वी आमचे म्हणणे ऐकून घेतले जावे, अशी विनंती वरिष्ठ वकील करुणा नंदी यांनी केली. यावेळी खंडपीठाने स्पष्ट केले की, सरकारी कार्यालयांबाबत, आम्ही ऐकणार नाही, पुढील सुनावणीवेळी हा मुद्दा तपासला जाईल असे खंडपीठाने म्हटले आहे.

भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यावरून सर्वोच्च न्यायालयाने यापुर्वीच सर्व राज्यांचे कान उपटले होते. याची आजच्या सुनावणीत न्यायालयाने नोंद घेतली. या प्रश्नी राज्यांनी शपथपत्र दाखल केले आहेत. खंडपीठाने पुढील तारखांना मुख्य सचिवांच्या वैयक्तिक उपस्थितीला स्थगिती दिली, तसेच भविष्यात काही चूक झाल्यास आदेश दिले जातील, असा इशाराही खंडपीठाने दिला आहे.

